**महाराष्ट्र शासन**

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**

१८ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई - ३२.

क्र.आस्थाप-२०२५/प्र.क्र.४३१/आस्थापना

दि. ४ मे, २०२६

**संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल या पदावर प्रतिनियुक्तीने भरतीची जाहिरात**

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ या विभागामध्ये संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याचे प्रस्तावित आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ व दि.१६/२/२०१८ अन्वये शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती आणि नियुक्तीची कार्यपद्धती याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार पर्यावरण विभागातील संचालक हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. संचालक पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत-

१. सदर अर्जदार भारतीय नागरिक असावा.

२. सदर प्रतिनियुक्ती ही प्रथमत: ३ वर्षासाठी किंवा सदर पदावर सरळसेवेद्वारे अथवा पदोन्नतीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीकरिता राहील.

३. सदर पदाची वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार एस-२७:११८५००-२१४१०० अशी आहे.

४. अर्जदार हा विज्ञान शाखेतील प्रथम श्रेणीतील पदव्युत्तर पदवीधारक किंवा रासायनिक अभियांत्रिकी, रासायनिक तंत्रज्ञान, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी किंवा पर्यावरण अभियांत्रिकी या विषयातील प्रथमश्रेणीतील पदव्युत्तर पदवीधारक असावा.

५. वरील शैक्षणिक अर्हता प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास शासकीय विभागामध्ये किंवा स्थानिक प्राधिकरणांत किवा शासनाच्या उद्योग, सार्वजनिक आरोग्य, नगर विकास, सार्वजनिक पाणीपुरवठा, मलनि:सारण किंवा वनीकरण विभागातंर्गत सांविधानिक संस्थेमध्ये जबाबदारीच्या पदावरील किमान १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. परंतु, प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संवर्धन जसे कि, सार्वजनिक सांडपाणी प्रकिया घातक कचरा व्यवस्थापन, औद्योगिक व वायु प्रदुषण नियंत्रण यामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य राहील. या पदाचे सविस्तर सेवाप्रवेश नियम सोबत जोडण्यात आले आहेत.

६. अर्जदाराविरुध्द कोणत्याही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी, तसेच अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

७. अर्जदाराने अर्जामध्ये त्यांची वैयक्तीक माहिती पुरवावी. (संपूर्ण नांव, सध्याचे पद, वेतन श्रेणी, शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, मोबाईल क्रमांक, अनुभव, आजपर्यंत केलेल्या सेवेची/ नियुक्तीची माहिती व अनुषंगिक इतर माहिती)

८.अर्जदाराने आवेदन अर्जावर स्वत: चा पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा.

९. सदर पदासाठी अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक १८.०५.२०२६ हा आहे.

१०. प्रतिनियुक्तीवर येण्यास इच्छुक अधिकारी यांनी जाहिरातीत नमूद केलेल्या विहीत मुदतीत अर्ज दाखल करावेत व अर्जाची एक प्रत अर्जदाराने त्याच्या संबंधित नियुक्ती कार्यालया मार्फत सादर करावी.

११. वर नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या इच्छुक अधिकाऱ्यांनी उपरोक्त पदासाठी आपले अर्ज मा.सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल), पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, रू.नं.२१७ (विस्तारीत), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांच्या नावे दिनांक १८.०५.२०२६ सायंकाळी ४.३० वा. पर्यंत पाठवावेत. प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र अर्जदाराला मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

( विशाल मदने )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

## सेवेचा तपशील

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव | |
| २ | पदनाम व सेवार्थ क्रमांक | |
| ३ | विभाग/कार्यालय | |
| ४ | वेतनश्रेणी | |
| ५ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | स्थायित्व प्रमाणपत्र | |
| ८ | जन्म दिनांक | |
| ९ | सेवेत आल्याचा दिनांक | |
| १० | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या (साक्षाकित प्रतीसह) मूळ गोपनीय अहवाल पाठवू नये. | |
| ११ | मत्ता व दायित्व सादर केली आहेत का? | |
| १२ | वयाचे ५०/५५ व्या वर्षाचे पुनर्विलोकन झाले आहे किंवा कसे (लागू नसल्यास) | |
| १३ | संबंधित अधिकाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील (पद व कालावधी) (प्रतिनियुक्ती कालावधी १० वर्षापेक्षा जास्त नसावा.) | |
| १४ | मागील प्रतिनियुक्तीवरुन परत आल्याच्या दिनांकापासून ३ वर्षे पूर्ण झाली आहेत का ? | |
| १५ | संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे ? | |
| १६ | प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे ? | |

(विशाल मदने)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

-१/प्रति

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

शुक्रवार, एप्रिल ३०, १९९३/वैशाख १०, शके १९१५

## भाग चार-अ

## महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ, यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

## पर्यावरण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० एप्रिल, १९९३

### भारताचे संविधान

क्रमांक आस्था-१०९१/(१०१)-कार्यासन-३- भारताचे संविधान यांच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील वर्ग- १ मधील पर्यावरण संचालक, शास्त्रज्ञ श्रेणी-१ आणि शास्त्रज्ञ श्रेणी-२ या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेतः-

१. (१) या नियमांना, पर्यावरण विभागातील पर्यावरण संचालक, शास्त्रज्ञ श्रेणी-१ आणि शास्त्रज्ञ श्रेणी-२ (सेवाप्रवेश) नियम, १९९३ असे म्हणावे,

(२) ते दिनांक ०१ जानेवारी, १९८९ पासून अमंलात आले असल्याचे मानण्यात येईल.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, ---

(क) आयोग याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे,

(ख) पदवी याचा अर्थ, सांविधिक विद्यापिठाची पदवी, असा आहे,

(ग) पर्यावरण विभाग याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण विभाग, असा आहे,

(घ) शासन याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे,

३. पर्यावरण विभागातील संचालक या पदावरील नियुक्ती एकतर, ----

(क) पर्यावरण विभागामध्ये शास्त्रज्ञ श्रेणी-१ हे पद धारण करणा-या व त्या पदावर तीन वर्षाहून कमी नसेल एवढी नियमित सेवा केलेल्या आणि या नियमाच्या खंड (घ) च्या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्याकरिता विहीत केलेली अर्हता धारण करणा-या व अनुभव असणा-या व्यक्तीमंधून काटेकोर निवडीच्या आधारे एका योग्य व्यक्तींला पदोन्नती देऊन करण्यात येईल, किंवा

(ख) (एक) भारतीय प्रशासकीय सेवेतून वरिष्ठ सम-श्रेणीतील योग्य अधिका-याची बदली करुन करण्यात येईल, किंवा

(दोन) शासनाच्या कोणत्याही विभागातील अन्य कोणत्याही वर्ग-१ सेवेतील समतुल्य पद धारण करणा-या योग्य अधिका-याची बदली करुन करण्यात येईल, किंवा,

D:\Satish\2010\Adhisuchana.doc

Scanned with OKEN Scanner

(ग) या नियमांच्या खंड (घ) च्या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणा-या व अनुभव असणा-या स्थानिक प्राधिकरणातील अथवा शासनाच्या अधिपत्याखालील सांविधिक मंडळातील योग्य अशा अधिका-याची प्रतिनियुक्तीवर बदली करुन करण्यात येईल, किंवा

(घ) जे उमेदवार,---

(एक) अगोदरच शासनाच्या सेवेत असल्याशिवाय ते पन्नास वर्षापेक्षा अधिक वयाचे नसतील,

(दोन) केवल विज्ञान किंवा रासायनिक आरोग्य अभियांत्रिकी, किंवा पर्यावरण अभियांत्रिकी यामधील प्रथम वर्गातील मास्टर पदवी धारण करीत असतील, आणि

(तीन) उप-खंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर शासनाच्या विभागातील किंवा स्थानिक प्राधिकरणातील किंवा शासनाच्या अधिपत्याखालील सांविधिक मंडळातील, उद्योग, सार्वजनिक आरोग्य, नगर विकास अथवा सार्वजनिक पाणीपुरवठा व मलनिस्सारण अथवा वनीकरण या क्षेत्रातील जबाबदारीच्या पदावरील दहा वर्षापेक्षा कमी नसेल एवढा अनुभव मिळवलेले आणि प्रदुषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षण याबद्दल आस्था असलेले असतील, अशा उमेदवारांमधून एका उमेदवारास नामनिर्देशित करुन करण्यात येईल:-

परंतु, प्रदुषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षण यामध्ये सांडपाण्याची व्यवस्था लावणे, जोखमीचे कचरा व्यवस्थापन, औद्योगिक व वायु प्रदुषणावर नियंत्रण ठेवणे, यांसारखी कामे केल्याचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, शासनास आयोगाच्या शिफारशीवरुन अपवादात्मक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्हीही बाबी धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा शिथील करता येईल.

४. पर्यावरण विभागातील शास्त्रज्ञ श्रेणी-१ या पदावरील नियुक्ती एकतर, ---

(क) पर्यावरण विभागामध्ये शास्त्रज्ञ श्रेणी-२ हे पद धारण करणा-या व त्या पदावर किमान तीन वर्षे, एवढी नियमित सेवा केलेल्या आणि या नियमाच्या खंड (घ) च्या उप-खंड (दोन) व (तीन) मध्ये नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्याकरिता विहीत केलेली अर्हता धारण करणा-या व्यक्तींमधून काटेकोर निवडीच्या आधारे एका योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल, किंवा

(ख) शासनाच्या कोणत्याही विभागातील अन्य कोणत्याही वर्ग-१ सेवेतील समतुल्य पद धारण करणा-या योग्य अधिका-याची बदली करुन करण्यात येईल, किंवा

(ग) या नियमाच्या खंड (घ) च्या उप-खंड (दोन) व (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणा-या व अनुभव असणा-या, स्थानिक प्राधिकरणातील अथवा शासनाच्या अधिपत्याखालील सांविधिक मंडळातील योग्य अशा अधिका-याची प्रतिनियुक्तीवर बदली करुन करण्यात येईल, किंवा



Scanned with OKEN Scanner

(घ) जे उमेदवार, ---

(एक) अगोदरच शासनाच्या सेवेत असल्या शिवाय ते चाळीस वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसतील, आणि

(दोन) केवल विज्ञान किंवा स्थापत्य या यंत्र अभियांत्रिकी, रासायनिक अभियांत्रिकी, रासायनिक तंत्रज्ञान, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी किंवा पर्यावरण अभियांत्रिकी यामधील प्रथम वर्गातील मास्टर पदवी धारण करीत असतील, आणि

(तीन) उप-खंड (दोन) मध्ये विहीत केलेली अर्हता संपादन केल्यानंतर शासनाच्या विभागातील किंवा स्थानिक प्राधिकरणातील किंवा शासनाच्या अधिपत्याखालील कोणत्याही सांविधिक मंडळातील उद्योग किंवा सार्वजनिक आरोग्यकिंवा नगर विकास किंवा सार्वजनिक पाणीपुरवठा व मलनिस्सारण किंवा वनीकरण या क्षेत्रातील जबाबदारीच्या पदावरील आठ वर्षांपेक्षा कमी नसेल एवढा अनुभव मिळवलेले आणि प्रदुषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षण याबद्दल आस्था असलेले असतील,

अशा उमेदवारांमधून एका उमेदवाराचा नामनिर्देशन करुन करण्यात येईल,

परंतु, प्रदुषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षण यांमध्ये सांडपाण्याची व्यवस्था लावणे, जोखमीचे कचरा व्यवस्थापन, औद्योगिक व वायु प्रदुषणावर नियंत्रण ठेवणे यासारखी कामे केल्याचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

परंतु, आणखी असे की, शासनास आयोगाच्या शिफारशीवरुन अपवादात्मक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्हीही बाबी धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शिथील करता येईल.

५. पर्यावरण विभागातील शास्त्रज्ञ श्रेणी-२ या पदावरील नियुक्ती एकतर, ---

(क) शासनाच्या कोणत्याही विभागातील अन्य कोणत्याही वर्ग-१ सेवेतील समतुल्य पद धारण करणा-या योग्य अधिका-याची बदली करुन करण्यात येईल, किंवा

(ख) या नियमाच्या खंड (ग) या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणा-या व अनुभव असणा-या स्थानिक प्राधिकरणातील अथवा शासनाच्या अधिपत्याखालील सांविधिक मंडळातील योग्य अधिका-याची प्रतिनियुक्तीवर बदली करुन करण्यात येईल, किंवा

(ग) जे उमेदवार, --

(एक) अगोदरच शासनाच्या सेवेत असल्याशिवाय ते पस्तीस वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसतील

(दोन) केवल विज्ञान किंवा स्थापत्य वा यंत्र अभियांत्रिकी किंवा रासायनिक अभियांत्रिकी, रासायनिक तंत्रज्ञान, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी किंवा पर्यावरण अभियांत्रिकी यामधील प्रथम वर्गातील मास्टर पदवी धारण करीत असतील, किंवा



Scanned with OKEN Scanner

(तीन) वरील उपखंड (दोन) मध्ये विहीत केलेली अर्हता संपादन केल्यानंतर शासनाच्या विभागातील अथवा विभागाअंतर्गत किंवा स्थानिक प्राधिकरणातील किंवा शासनाच्या अधिपत्याखालील कोणत्याही सांविधिक मंडळातील उद्योग किंवा सार्वजनिक पाणीपुरवठा व मलनिस्सारण किंवा वनीकरण या क्षेत्रातील जबाबदारीच्या पदावरील पाच वर्षांपेक्षा कमी नसेल एवढा अनुभव मिळवलेले आणि प्रदुषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षण याबद्दल आस्था असलेले असतील, -
-

अशा उमेदवारांमधून एका उमेदवारास नामनिर्देशित करुन करण्यात येईल-

परंतु, प्रदुषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षण यामध्ये सांडपाण्याची व्यवस्था लावणे, जोखमीते कचरा व्यवस्थापन औद्योगिक व वायु प्रदुषणावर नियंत्रण ठेवणे यासारखी कामे केल्यास प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल,

परंतु, आणखी असे की, शासनास, आयोगाच्या शिफारशीवरुन अपवादात्मक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्हीही बाबी धारण करणा-या उमेदवाराच्या बाबतीत वयोमर्यादा शिथील करता येईल

६. नियम (३) व (४) यामध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नती आणि नामनिर्देशन याद्वारे करावयाची नियुक्ती ५०: ५० या प्रमाणात करण्यात येईल.

७. नियम ३, ४ व ५ यामध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीकरिता परिवीक्षाधीन असेल.

८. नियम ३, ४ व ५ यामध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील अथवा तिला त्यातून सूट मिळालेली नसेल तर त्यासंदर्भात करण्यात आलेल्या नियमांनुसार तिने त्या परीक्षा उत्तीरण होणे आवश्यक आहे.

९. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी शासनाच्या मते सेवेची निकड भागवणे गरजेचे असेल तर, शासनास आवश्यक तेथे आयोगाशी विचार विनिमय केल्यानंतर नामनिर्देशन आणि पदोन्नती याद्वारे सेवाभरती करण्याकरिता या नियमांमध्ये विहीत केलेली टक्केवारी शिथील करुन नियम (३) व (४) यांमध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्ती करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( यु. के. मुखोपाध्याय )
शासनाचे सचिव

D:\Satish\2010\Adhisuchana.doc

Scanned with OKEN Scanner

प्रा. क्र. ५२ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, एप्रिल ३०, १९९३/वैशाख १०, शके १९१५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाचे केंद्रीय व अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि चार-ब यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश वगळून) नियम व आदेश

### ENVIRONMENT DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated the 20th April 1993

CONSTITUTION OF INDIA

No. ESI. 1091/(101)-Desk-III.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Director of Environment, Scientist-Grade-I and Scientist-Grade-II in Class-I in the Environment Department of the Government of Maharashtra, namely :—

1. (1) These rules may be called the Director of Environment, Scientist-Grade-I and Scientist-Grade-II in the Environment Department (Recruitment) Rules, 1993.

(2) They shall be deemed to have become in force with effect from the 1st January 1989.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(a) " Commission " means the Maharashtra Public Service Commission;

(b) " degree " means a degree of a statutory university;

(c) " Environment Department " means the Environment Department of the Government of Maharashtra;

(d) " Government " means the Government of Maharashtra.



Scanned with OKEN Scanner

3. Appointment to the post of Director in the Environment Department shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of strict selection from amongst persons holding the post of Scientist-Grade-I in the Environment Department having not less than three years regular service in that post and possessing qualifications and experience prescribed for appointment by nomination in sub-clauses (*ii*) and (*iii*) of clause (*d*) of this rule; or

(*b*) (*i*) by transfer of a suitable officer, in senior time-scale, from the Indian Administrative Service; or

(*ii*) by transfer of a suitable officer holding an equivalent post in any other Class-I service in any department of Government;

(*c*) by transfer on deputation of a suitable officer from a local authority or a statutory body under Government possessing qualifications and experience mentioned in sub-clauses (*ii*) and (*iii*) of clause (*d*) of this rule; or

(*d*) by nomination from amongst candidates who,—

(*i*) unless already in the service of Government are not more than fifty years of age;

(*ii*) possess a Master degree in first class in pure Science or Chemical Engineering, Chemical Technology, Public Health Engineering or Environmental Engineering; and

(*iii*) possess not less than ten years experience gained after acquiring the qualification mentioned in sub-clause (*ii*) in a responsible position, in Government Department or in a local authority or a statutory body under Government in the field of industry, public health, urban development or public water supply and disposal of sewage or afforestation, having concern with control of pollution and protection of environment:

Provided that, preference may be given to candidates having practical experience of working in control of pollution and protection of environment such as effluent treatment, hazardous waste management, control of industrial and air pollution etc.

Provided further that, the age limit may be relaxed by Government on the recommendation of the Commission in favour of candidates possessing exceptional qualification or experience or both.

4. Appointment to the post of Scientist Grade-I in the Environment Department shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of strict selection from amongst the persons holding the post of Scientist Grade II in Environment Department having regular service in that post for at least three years and possessing qualifications prescribed for appointment by nomination in sub-clauses (*ii*) and (*iii*) of clause (*d*) of this rule; or

(*b*) by transfer of a suitable officer holding an equivalent post in any other class-I service in any department of Government; or

Scanned with OKEN Scanner

(*c*) by transfer on deputation of a suitable officer from Local authority or a statutory body under Government possessing qualifications and experience mentioned in sub-clauses (*ii*) and (*iii*) of clause (*d*) of this rule; or

(*d*) by nomination from amongst candidates who,—

(*i*) unless already in the service of Government are not more than forty years of age; and

(*ii*) possess Master's degree in first class in pure science or Civil or Mechanical Engineering, Chemical Engineering, Chemical Technology, Public Health Engineering or Environmental Engineering; and

(*iii*) possess not less than eight years' experience, gained after acquiring qualification prescribed in sub-clause (*ii*) in a responsible position, in Government Department or in a local authority or any statutory body under Government in the field of industry or Public Health or Urban Development or Public Water Supply and disposal of sewage or Afforestation, having concern with control of pollution and protection of environment :

Provided that preference may be given to candidate having practical experience of working in control of pollution and protection of environment such as effluent treatment, hazardous waste management, control of industrial and air pollution, etc :

Provided further that, the age limit may be relaxed by Government on the recommendation of the Commission in favour of candidates possessing exceptional qualification or experience or both.

5. Appointment to the post of Scientist Grade-II in the environment Department shall be made either,—

(*a*) by transfer of a suitable officer holding an equivalent post in any other Class I service in any department of Government ; or

(*b*) by transfer on deputation of a suitable officer from a local body or a statutory body under Government possessing qualifications and experience mentioned in sub-clauses (*ii*) and (*iii*) of clause (*c*) of this rule; or

(*c*) by nomination from amongst candidates who,—

(*i*) unless already in the service of Government are not more than thrity five years of age ;

(*ii*) possess Master's degree in first class in pure Science or Civil or Mechanical Engineering or Chemical Engineering, Chemical Technology, Public Health Engineering or Environmental Engineering ; and

(*iii*) possess experience of not less than five years, gained after acquiring, qualifications prescribed in sub-clause (*ii*) above, in a responsible position in or under a Government Department, or in a local authority or any statutory body under Government, or in the field of industry, or public health or urban development or public water supply and disposal of sewage or afforestation, having concern with control of pollution and protection of environment :

Scanned with OKEN Scanner

Provided that, preference may be given to candidates having practical experience of working in control of pollution and protection of environment such as effluent treatment, hazardous waste management, control of industrial and air pollution, etc.

Provided further that, the age limit may be relaxed by Government on the recommendation of the Commission in favour of candidates possessing exceptional qualification or experience or both.

6. Appointment to the posts mentioned in rules (3) and (4) by promotion and nomination shall be made in the ratio of 50 : 50.

7. A person appointed to the posts mentioned in rules 3, 4 and 5 by nomination shall be on probation for a period of two years.

8. A person appointed to the posts mentioned in rules 3, 4, and 5 shall be required to pass the examinations in Hindi and Marathi according to rules made in that behalf unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

9. Notwithstanding anything contained in these rules, if in the opinion of Government the exigencies of service so require, Government may, after consultation with the Commission, wherever necessary, make appointments to the posts mentioned in rules (3) and (4) in relaxation of the percentage prescribed in these rules for recruitment by nomination and promotion.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

U. K. MUKHOPADHYAY,
Secretary to Government.



Scanned with OKEN Scanner